MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318
Special Issue August 2019

# विद्यावार्ता


Peer Reviewed International Refereed Research Journal

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास विषया अंतर्गत राष्ट्रीय चर्चासत्र

(3) Dr. Kailas Sawant
(History)



# मराठवाडा प्रदेशाचा प्रवाहित होणारा इतिहास

(इ.स.पूर्व ते इ.स.२०१९)

संपादक
डॉ.मुकूंद अ.देवर्षी

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Special Issue, August 2019

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आणि

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास विषयाअंतर्गत

राष्ट्रीय चर्चासत्र

# मराठवाडा प्रदेशाचा प्रवाहित होणारा इतिहास

(इ.स.पूर्व ते इ.स.२०१९)

संपादक

डॉ.मुकूंद देवर्षी

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

115

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

August 2019
Special Issue

018

# Index

01) Injustice with Marathwada analyzing history
Dr. Balaji Munde, Jalna College of Social Work, Jalna, ||24

02) मराठवाडा परिसरातील राष्ट्रकुट राजवंश व त्यांची राज्यव्यवस्था
डॉ. चंदन एम. बावलगावे, चापोली, ता. चाकूर, जि. लातूर. ||28

03) मराठवाड्यातील महिला चळवळ - एक दृष्टीक्षेप
प्रा. डॉ. संतोष रोहिदास पहारे, सिध्दार्थ महाविद्यालय जाफ्राबाद जि. जालना ||30

04) हैद्राबाद संग्रामात महिलांचा सहभाग
प्रा. फड सुदाम पंढरीनाथ, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड ||34

05) मराठवाडा मुक्ती संग्राम व आजचा मराठवाडा
प्रा.डॉ.अंगद पवार, लोहा, ता.लोहा जि.नांदेड ||36

06) मराठवाडा प्रदेशातील विद्या : कला, स्थापत्य यांचा विकास
प्रा. गंगणे अमोल उत्तमराव, घाटनांदूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड. ||38

07) मराठवाड्यातील धार्मिक पर्यटन उद्योगातील संधी
प्रा. भोसले राजेसाहेब गंगाधरराव, मुरूड, ता.जि.लातूर ||39

08) स्वा. से. गंगाप्रसादजी अग्रवाल यांचे हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील योगदान
डॉ.रामभाऊ मुटकुळे, वसमत जि.हिंगोली ||41

09) मराठवाड्याच्या विकासात शंकरराव चव्हाण यांच्या राजकीय नेतृत्वाचे योगदान
प्रा.डॉ. बबन पवार, कळमनुरी जि.हिंगोली. ||43

10) मराठवाड्यातील पर्यटन उद्योग- समस्या व उपाय
प्रा.डी.एम. रणदिवे, मुरुड ता.जि.लातूर ||44

11) मराठवाडयातील भाषा
डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, बीड ||47

12) हैदरा मुक्ती लढयात बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान
प्रा.डॉ.सावंत के.डी.,गेवराई ||49

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03



116

12

# हैदरा मुक्ती लढयात बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

प्रा.डॉ.सावंत के.डी.
(इतिहास विभाग प्रमुख)
महिला महाविद्यालय,गेवराई

**********

**प्रस्तावना**

भारतातील प्रातांची पुनर्रचना होण्याच्या अगोदर अस्तित्वात असलेल्या हैदरा संस्थानाचा संस्थापक 'निजाम उल-मुल्कने इ.स.१७२४ मध्ये हैदरा राज्याची स्थापना केली' [१] दक्षिणेच्या इतिहासावर इ.स.१७२४ ते १९४८ पर्यंत सव्वादोनशे वर्ष स्वतःच्या घराण्याचा दक्षिणेमध्ये दबदबा निर्माण केला. या हैदराबाद संस्थानात मराठवाडा विभागातील औरंगाबाद,बीड, परभणी, नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांचा समावेश होता. निजाम उल मुल्क अत्यंत धुर्त व व्यवहारवादी असल्यामुळे त्याने सर्वांना बरोबर घेवून आपली सत्ता बळकट केली. त्याच्या उत्तराधिकाऱ्याने निजाम पाचव्यापर्यंत परिधर्म सहिष्णूतेचे वातावरण ठेवले. परंतु निजाम सहाव्यापासून हिंदू धर्मीयावर अन्याय अत्याचार वाढला. त्यानंतर दि.२९ ऑगस्ट १९११ या दिवशी म्हणजेच वयाच्या २५ व्या वर्षी मीर उस्मान अलिखान बहादूर सातवा निजाम सत्तेवर आला.[२] मीर उस्मान अलिखानच्या चुकीच्या मुस्लीम धार्जिण धोरणामुळे हैदरा संस्थानामधील विशेष करुन मराठवाड्यातील हिंदू समाजात तेढ निर्माण होण्यास प्रारंभ झाल्याचे दिसते. मराठवाड्यात इ.स.१९११ मध्ये हिंदू ८२.७०% होते तर मुस्लीम १०.१०% टक्के ऐवढे होते. हिंदू बहुसंख्याक असून त्यांच्यावर अन्याय करणारे कायदे अस्तीत्वात आणल्यामुळे निमाम राजवटीमध्ये आपण गुलाम असल्याची भावना हिंदू समाजात हळूहळू वाढीस लागल्याचे दिसते.[३]

मीर उस्मान अलीखानच्या कारभारावर टिका करताना महादेव काळे म्हणतात, निजामाचे मुस्लीम धार्जिणे धोरण, नजराणा पध्दत, सभा आणि वृत्तपत्रे यावर बंदी या कारणामुळे मराठवाड्यातील हिंदू समाज अन्यायाने खचून गेल्याचे दिसतो.[४] या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी मराठवाड्यातील जनता पेटून उठल्याची दिसते.

मराठवाड्यातील इतर जिल्ह्याच्या मानाने बीड जिल्ह्यातील राजकीय चळवळ इ.स.१९३६ नंतर सुरु झाली. या चळवळीत समाजाच्या सर्वच स्तरातून तरुण, तरुणी पुढे आले. निजामाच्या रझाकारी सत्तेविरुध्द लढत असताना काही स्वातंत्र्य सैनिकाला हुतात्म्य आले तर काहींना जेलमध्ये जावे लागले तसेच काहींना स्थानबद्ध व्हावे लागले.

विशेष करुन बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजातील स्वातंत्र्य सैनिकांना सर्व सुखे असतानाही हैदरा मुक्ती लढयात सहभागी झाले. त्यात कांकरिया मानकुंवर, कोटेचा रतनलाल, कोटेचा हिरालाल, जैन सनतकुमार, तोष्णीवाल झुंबललाल यांचा समावेश होता. यांनी हैदरा मुक्ती लढयात दिलेल्या योगदानाची माहिती समाजाला व्हावी हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

**बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान :**

**१) कांकरिया मानकुंवर कन्हैयालाल :**

मानकुंवर कांकरिया यांचा जन्म १९२६ रोजी बीड येथे झाला. एस.एस.सी.पर्यंत शिक्षण पुर्ण केले. घरची आर्थिक परिस्थिती चांगली असताना ही मानकुंवर कांकरिया यांनी हैदरा स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली. गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलन चालू होते. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे गवॉलिया टॅक मैदानावर 'छोडो भारत' हा ठराव पास करुन या आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधीजीकडे सोपविले. त्यानुसार गांधीजीच्या नेतृत्वाखाली ९ ऑगस्ट १९४२ रोजी ब्रिटिश सरकारच्या विरोधात आंदोलन सुरु झाले. या आंदोलनास 'चलेजाव किंवा छोडो भारत चळवळ' या नावाने ओळखले जाते. महात्मा गांधीजींच्या आदेशानुसार इ.स.१९४० साली स्वामीजींनी पहिला वैयक्तिक सत्यागृह केला. त्यामुळे त्यांना १२ सप्टेंबर १९४० रोजी अटक केली. यानंतर ठिकठिकाणी वैयक्तिक सत्याग्रह करण्यास सुरुवात झाली. निजाम सरकारने लगेच स्वामीजींना अटक करुन 'निजामाबाद' येथील जेलमध्ये पाठविले होते. स्वामीजींची नुकतीच कारावासातून नोव्हेंबर १९४१ रोजी सुटका झाली होती. महात्मा गांधीजींनी चलेजाव चळवळीतून संस्थानातील जनतेलाही सहभागी करुन घ्यावयाचे ठरविले होते. त्यासाठी त्यांनी संस्थांनातील जनतेला तेथील प्रतिगामी व जुलमी राजवटीविरुध्द स्वातंत्र्यासाठी आंदोलन सुरु करण्याचे आदेश दिले होते.[५]

हैदरा स्वातंत्र्य आंदोलनाचे नेते स्वामीजी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सभेला मुंबईला ८ ऑगस्ट १९४२ रोजी गेले होते. महात्मा गांधीजींनी त्यांना राज्यात आंदोलन सुरु करण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्वामीजींनी १९४२ साली निजाम सरकारच्या विरोधात आंदोलन सुरु केले. मे १९४२ मे मध्ये गांधीजींनी जाहिर केले की

हैदराचा स्वातंत्र्य संग्राम हा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचाच एक भाग आहे.[६] गांधीजीप्रमाणेच स्वामीजींनी ही संस्थानातील जनतेला 'करा अथवा मरा' हा आदेश दिला. त्यानुसार संस्थांनातील जनतेने १९४२ साली सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन सुरु केले. या आंदोलनात कांकरिया मानकुंवर हे सहभागी झाल्यामुळे त्यांना १४ महिने स्थानबद्ध करण्यात आल्याचे दिसते.[७]

**२) कोटेचा रतनलाल हंसराज :**

रतनलाल कोटेचा यांचा जन्म १९१६ साली बीड येथे झाला. बी.कॉमचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर लगेच हैदरा स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होवून इ.स.१९३२ मध्ये अहमदनगर येथे रतनलाल कोटेचा यांनी तात्पुरती बीड जिल्हा कॉंग्रेस कचेरी उघडली होती. त्याबद्दल त्यांना पाच महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्यानंतर झेंडा सत्याग्रह ७ ऑगस्ट १९४७ रोजी सुरु झाला. राज्यात भारतीय ध्वज फडकावणे, ध्वज हातात घेवून प्रभारत फेज्या काढणे, सभा आयोजित करणे व तिरंगा ध्वज फडाकवून त्यास सलामी देण्याचे कार्यक्रम करावेत असे स्टेट कॉंग्रेसने जनतेला आवाहन केले. या आवाहनाला जनतेने मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला. निजाम सरकारची बंदी असून ही मराठवाड्यात १०४६ पेक्षा अधिक गावात झेंडा सत्याग्रह करण्यात आले. अशावेळी सत्याग्रहींनी पोलिस व रझाकारांच्या अन्याय व अत्याचांराची पर्वा केली नाही. या आंदोलनात कोटेचा रतनलाल यांनी सत्याग्रह चळवळीचे भूमिगत संचालनाचे कार्य सरहद्दीवर केल्याचे दिसते.[८]

**३) कोटेचा रतनलाल हंसराज :**

हिरालाल कोटेचा यांचा जन्म १९१४ साली बीड येथे सधन कुटूंबात झाली. त्यांचे बी.ए.चे शिक्षण चालू असतानाच हैदरा स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहात भाग घेतला. १९४० साली औरंगाबाद येथे वैयक्तिक सत्याग्रह केला. त्याबद्दल त्यांना दोन महिने स्थानबद्ध केले होते. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांना पुन्हा अटक झाली व १६ महिने स्थानबद्ध करण्यात आले. ९ इ.स.१९४४ साली त्यांचा मृत्यू झाला. राष्ट्रवादाने प्रेरित झालेल्या ध्येयवेडया स्वातंत्र्य सेनालीला अवघे तीस वर्षाचे आयुष्य लाभल्याचे दिसते.

**४) जैन सनतकुमार लोनीचंद :**

सनतकुमार जैन यांचा जन्म १९२१ मध्ये बीड येथे झाला. सधन कुटूंबात जन्म झाल्यामुळे सर्व सुखे समोर असतानाही या तरुणाने हैदरा मुक्ती लढयात सक्रीय सहभाग घेतला. नांदेड येथे महाराष्ट्र परिषदेमध्ये त्यांनी चिटणीस म्हणून काम केल्याचे दिसते.१०

**५) तौष्णीवाल झुंबललाल रामचंद्र :**

झुंबललाल तोष्णीवाल यांचा जन्म १९०६ मध्ये धारुर जि.बीड येथे झाला. मराठी शाळेत सातवीपर्यंतचे शिक्षा पुर्ण केले. जालना जिल्हा ता.अबंड येथे वैयक्तिक सत्याग्रह केल्यामुळे निजाम सरकारकडून त्यांना तेरा महिने सक्त मजूरीची शिक्षा झाली.११ त्यानंतर हैदरा मुक्ती आंदोलनात दि.१७ सप्टेंबर १९४८ पर्यंत सक्रीय सहभाग घेतल्याचे दिसते.

**सारांश :**

वरील विषयाच्या परिप्रेक्षात हैदरा मुक्ती लढयात मराठवाड्यातील इतर जिल्ह्याप्रमाणेच बीड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिल्याचे दिसून येते. विशेष करुन बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक स्वातंत्र्य सेनानीमधील कांकरिया मानकुंवर, कोटेचा रतनलाल, कोटेचा हिरालाल, जैन सनतकुमार व तौष्णीवाल झुंबरलाल यांनी सर्व सुखाचा त्याग करुन निजामी अन्यायी राजवटीला शह दिल्याचे दिसते. त्यांच्या योगदानामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाल्याचे दिसते.

**संदर्भ सूची**

१. इम्पीरियल गॅझेटर ऑफ इंडिया, पोव्हिशिअल सिरिज, हैदरा स्टेट सुप्रिटेंड ऑफ गव्हर्नमेंट प्रिटिंग, कलकत्ता १९०९, पृष्ठ १५
२. संशोधक, त्रेमासिक, इतिहासाचार्य राजवाडे संशोधक मंडळ,धुळे, वर्ष-५१, अंक-२ जुन आणि सप्टेंबर,१९८३, पृष्ठ २९
३. देऊळगावकर कि.पा., (अनुवादक), हैदरा संग्रामाच्या आठवणी, स्वाती रामानंदतीर्थ, पृष्ठ ६४
४. डॉ.कुंटे भ.ग., (संपा), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, २०११, पृष्ठ १५
५. देव प्रभाकर, (संपा), हैदरा मुक्ती संग्राम, स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी, स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, १९९९, पृष्ठ ५३
६. डॉ.कुटे भ.ग., (संपा), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९७६, पृष्ठ ३८३
७. डॉ.कुटे भ.ग., (संपा), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, २०११, पृष्ठ ४५
८. किता, पृष्ठ ६१
९. किता, पृष्ठ ६१
१०. किता, पृष्ठ १२४
११. किता, पृष्ठ १५८



118